सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १५ जानेवारी २०२१

***ग्रामपंचायत निवडणुकांसाठी***
***सरासरी ७९ टक्के मतदान***

मुंबई, दि. १५ (रा.नि.आ.): राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १२ हजार ७११ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकींत प्राथमिक अंदाजानुसार सरासरी ७९ टक्के मतदान झाले, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे दिली.

श्री. मदान यांनी सांगितले की, राज्यातील सुमारे १४ हजार २३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा ११ डिसेंबर २०२० रोजी करण्यात आली होती. त्यातील काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका पूर्णत: तर काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका अशंत: बिनविरोध झाल्या आहेत. सरपंच व सदस्यपदाच्या लिलावप्रकरणी नाशिक जिल्ह्यातील उमराणे (ता. देवळा) आणि नंदुरबार जिल्ह्यातील खोंडामळी (ता. नंदुरबार) ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया रद्द केली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सहा तालुक्यांतील १६२ ग्रामपंचायतींसाठी २० जानेवारी २०२१ रोजी मतदान होणार आहे. अशा विविध कारणांमुळे आज प्रत्यक्षात १२ हजार ७११ ग्रामपंचायतींसाठी मतदान झाले. गडचिरोली जिल्ह्यात २२ जानेवारी २०२१ रोजी; तर अन्य सर्व जिल्ह्यांत १८ जानेवारी २०२१ रोजी मतमोजणी होईल.

आज मतदान होत असलेल्या ग्रामपंचायतींच्या १ लाख २५ हजार ७०९ जागांसाठी एकूण ३ लाख ५६ हजार २२१ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. छाननी आणि माघारीनंतर २ लाख ४१ हजार ५९८ उमेदवार शिल्लक होते. त्यापैकी २६ हजार ७१८ उमेदवार बिनविरोध विजयी घोषित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे अंतिमत: २ लाख १४ हजार ८८० उमेदवार आज प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात होते. त्यासाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळत मतदान झाले. अनेक ठिकाणी सायंकाळी उशिरापर्यंत मतदानासाठी मतदारांच्या रांगा होत्या. गडचिरोली जिल्ह्यात आणि गोंदिया जिल्ह्यातील चार तालुक्यांत मात्र दुपारी ३ पर्यंतच मतदानाची वेळ होती, असेही श्री. मदान यांनी सांगितले.

**ग्रामपंचायत निवडणुकांसाठी झालेल्या मतदानाची प्राथमिक अंदाजानुसार जिल्हानिहाय टक्केवारी (कंसात ग्रामपंचायतींची संख्या): ठाणे-** १४३, **पालघर-** ३, **रायगड-** ७८, **रत्नागिरी-** ३६०, **सिंधुदुर्ग-** ६६, **नाशिक-** ५६५, **धुळे-** १८२, **जळगाव-** ६८७, **नंदुरबार-** ६४, **अहमनगर-** ७०५, **पुणे-**

६४९, **सोलापूर-** ५९३, **सातारा-** ६५२, **सांगली-** १४२, **कोल्हापूर-** ३८६, **औरंगाबाद-** ५७९, **बीड-** १११, **नांदेड-** १०१३, **परभणी-** ४९८, **उस्मानाबाद-** ३८२, **जालना-** ४४६, **लातूर-** ३८३, **हिंगोली-** ४२१, **अमरावती-** ५३७, **अकोला-** २१४, **यवतमाळ-** ९२५, **वाशीम-** १५२, **बुलडाणा-** ४९८, **नागपूर-** १२७, **वर्धा-** ५०, **चंद्रपूर-** ६०४, **भंडारा-** १४५, **गोंदिया-** १८१ आणि **गडचिरोली-** १७०. **एकूण-** १२,७११.

---

**<u>ग्रामपंयात निवडणूक एक दृष्टिक्षेप</u>**

- निवडणूक जाहीर ग्रामपंचायती- १४,२३४
- आज प्रत्यक्ष मतदान झालेल्या ग्रामपंचायती- १२,७११
- एकूण प्रभाग- ४६,९२१
- एकूण जागा- १,२५,७०९
- प्राप्त उमेदवारी अर्ज- ३,५६,२२१
- अवैध नामनिर्देशनपत्र- ६,०२४
- वैध नामनिर्देशनपत्र- ३,५०,१९७
- मागे घेतलेली नामनिर्देशनपत्र- ९७,७१९
- बिनविरोध विजयी होणारे उमेदवार- २६,७१८
- अंतिम निवडणूक रिंगणातील उमेदवार- २,१४,८८०

0-0-0

**(Jagdish More, SEC)**